# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातुर
## VILASRAO DESHMUKH GOVERNMENT MEDICAL COLLEGE, LATUR
मारवाडी राजस्थान शाळेजवळ, गांधीचौक, लातुर
Near Marwadi Rajasthan School, Gandhi Chowk, Latur.( Maharashtra ) 413512
Tel. No. © 02382-249292, (H) 02382-242199 Web Site- www.gmclatur.org
E. Mail – dean_gmchl@rediffmail.com


जा.क्र.विदेशावैमला/आस्था-राज/सहा.प्राध्या/जाहीरात/ 627 /२०२६ दिनांक:- २०/०१/२०२६

## (जाहीरात)

विषय :- सहाय्यक प्राध्यापक पदे ३६४ दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात संस्थास्तरावर स्थानिक निवड समितीमार्फत भरणेबाबत

संदर्भ :- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक :- एलईसी-१४२४/ प्र.क्र.२२८/वैसेवा-३ दिनांक १८ जुलै २०२४

वरील संदर्भाधीन शासन निर्णयानुसार तसेच दि. १० ऑगस्ट २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, अधिष्ठातांना प्रदान केलेल्या प्राधिकारात विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करून सहाय्यक प्राध्यापक "गट-ब" या पदावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरती नियुक्तीचे अधिकार संस्थास्तरावर संबंधीत अधिष्ठातांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथील महाविद्यालय आस्थापनेवरील सहाय्यक प्राध्यापकांची खालील विषयातील रिक्त पदे विनिमं मार्फत ३६४ दिवसांकरिता भरण्याकरिता इच्छूक उमेदवारांकडून विहीत कालावधीमध्ये अर्ज स्विकारण्यात येणार आहेत.

| अ.क्र | विषय | सहाय्यक प्राध्यापक रिक्त पदाची संख्या |
|---|---|---|
| ०१ | न्यायवैद्यकशास्त्र | ०१ |
| ०२ | जनऔषधवैद्यकशास्त्र (PSM) | ०३ |
| ०३ | औषधशास्त्र | ०१ |
| ०४ | मनोविकृतीशास्त्र | ०१ |
| | **एकूण** | **०६** |

| | |
|---|---|
| अर्ज स्वीकारण्याची तारीख | दि.२०/०१/२०२६ ते २८/०१/२०२६ (सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत) |
| पात्र उमेदवारांच्या मुलाखती | ३०/०१/२०२६ दु. ०३.०० वाजता |
| मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता कार्यालय, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर |

१. शैक्षणिक अहर्ता :

सहाय्यक प्राध्यापक :- राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार.

वेतन :- शासन नियमाप्रमाणे-

वयोमर्यादा :- मुलाखतीच्या दिवशी खुला प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवाराचे वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे :- अर्जासोबत खालील प्रमाणे साक्षंकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२. १.प्रथम द्वितीय, तृतीय वर्ष एमबीबीस गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्र २) एमडी/एमएस/ परीक्षा गुणपत्रीका/पदवी प्रमाणपत्र व प्रयत्न प्रमाणपत्र ३) एमबीबीएस/एमडी/एमएस/ एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र ४) अनुभव प्रमाणपत्र ५) मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारासाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र/नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र (३१.०३.२०२६ पर्यंतचे) ६) जन्म तारखेकरीता एसएससी प्रमाणपत्र. ७) एचएससी प्रमाणपत्र. ८) एमएस-सीआयटी उत्तीर्ण प्रमाणपत्र.

सहाय्यक प्राध्यापक तथा तत्सम पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती ३६४ दिवसाकरीता तात्पुरत्या स्वरूपाची राहील व सदर पदे महाराष्ट्रात लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाने भरेपर्यंत किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे आधी घडले तो पर्यंत करण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

१) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

२) सहाय्यक प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी :- सदरील उमेदवारांना दि. ३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष मात्र) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मूळ अनुदानातून १०-कंत्राटी सेवा या उद्दीष्टांमधून मागविण्यात येईल.

३) वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय अराखीव वर्गाकरीता ३८ वर्षापेक्षा अधीक असणार नाही. तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

४) गुणवत्ता यादी ही उपरोक्त नमुद केलेल्या शैक्षणीक अर्हतेनुसार प्राप्त परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५) जाहीरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेले आहेत.

६) उमेदवार या महाविद्यालया व्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे "ना-हरकत प्रमाणपत्र" अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरीक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे ? असल्यास केव्हा ? (तारीख नमूद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.

७) ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी पर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८) सदर पदांकरीता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ ३६४ दिवसांसाठी अत्यंत तात्पूरत्या स्वरूपात कंत्राटी स्वरूपात राहील. ३६४ दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा ३६४ दिवसांसाठी पुनर्नियुक्ती बाबत प्रस्ताव मा.आयुक्त (वैद्यकीय) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

९) अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांकित साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

१०) सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

११) (अ) प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. तसेच एम.डी., एम.एस. किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईंट, ग्रेड प्रमाणपत्र. (ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका. (क) एम.एस.सी. किंवा एस.सी.आय. नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र. (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र. (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (फ) पॅनकार्ड व आधार कार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

अधिष्ठाता,<br>
विलासराव देशमुख शासकीय<br>
वैद्यकीय महाविद्यालय, लातूर

प्रति,

१) सूचना फलक :- अधिष्ठाता कार्यालय, मुलांचे व मुलींचे वस्तीगृह, मध्यवर्ती ग्रंथालय, वि.दे.शा.वै.म., लातूर

२) उपरोक्त संबंधीत सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, वि.दे.शा.वै.म., लातूर

३) वैद्यकीय अधिक्षक, वि.दे.शा.वै.म व रुग्णालय लातूर

४) अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत :- १) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर